श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित

# विज्ञान महाविद्यालय काँग्रेस नगर, नागपूर

**MINISTRY OF EDUCATION Govt. of India, NBT India, महाराष्ट्र शासन, ZERO MILE YOUTH FOUNDATION आयोजित**



## 📚 बुक फेस्टिवल – नागपूर २०२५📚

## अहवाल

**(दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ ते दिनांक ३० नोव्हेंबर २०२५)**

**स्थळ :– रेशीमबाग मैदान, नागपूर**

भारताचे पहिले कृषिमंत्री, भारतीय संविधान समितीचे सदस्य तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष शिक्षण महर्षी डॉ. . पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवन व कार्याचा प्रवास अतिशय प्रेरणादायी आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये तरुणांना शिक्षण, समाज आणि विज्ञान यामध्ये कार्य करण्यासाठी भाऊसाहेबांचे कार्य अत्यंत प्रेरणादायी असून भाऊसाहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक, संविधान समितीतील त्याच प्रमाणात शिक्षण क्षेत्रातले जीवन व कार्य याबाबतीत अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यांच्या समृद्ध कार्यावर आधारित अनेक ग्रंथ, स्मृती संग्रह, चरित्रे, संशोधनपर पुस्तके तसेच **१२५ व्या जयंतीनिमित्त भारत सरकारने जाहीर केलेले स्मरण नाणे** आजही तरुण पिढीसाठी दिशादर्शक ठरते.

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवनकार्यावरील पुस्तके, साहित्य हे सर्व साहित्य तरुणांपर्यंत पोहोचावे त्यासोबत त्यांच्या विचारांचा प्रसार समाजातील सर्व स्तरापर्यंत व्हावा म्हणून **श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती** द्वारा संचालित **विज्ञान महाविद्यालय, नागपूर** यांच्यावतीने **बुक फेस्टिवल – नागपूर २०२५** मध्ये भव्य व आकर्षक **भाऊसाहेब देशमुख साहित्य स्टॉल** उभारण्यात आलेले होते.

दिनांक **२२ नोव्हेंबर २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२५** या दरम्यान पार पडलेल्या या भव्य पुस्तक महोत्सवाला नागपूरकरांसह संपूर्ण विदर्भातील वाचकवर्गाने प्रचंड प्रतिसाद दिला. नऊ दिवसांच्या या महोत्सवात विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, वाचनप्रेमी, नागरिक आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले. भाऊसाहेब देशमुख साहित्य स्टॉल हे महोत्सवाचे केंद्रबिंदू ठरले असून, जीवनकार्याशी संबंधित पुस्तके, लघु पुतळे, स्मरण नाणे आणि इतर साहित्य यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

**स्टॉलची वैशिष्ट्ये:**

- भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवनावर आधारित सर्व महत्त्वपूर्ण ग्रंथ
- संविधान, शिक्षण, शेती व समाजविकास यावरील दुर्मिळ पुस्तके
- १२५ वी जयंतीनिमित्त भारत सरकारचे **स्मरण नाणे**
- भाऊसाहेबांचे आकर्षक **स्टॅच्यू**
- विद्यार्थ्यांसाठी आणि अभ्यासकांसाठी मार्गदर्शक साहित्य.

## 🌟 भाऊसाहेबांचे विचार — युवा पिढीसाठी दीपस्तंभ

आजच्या काळात शिक्षण, विज्ञान, संविधान मूल्ये, समाजसेवा आणि कृषी विकास या क्षेत्रांमध्ये तरुणांनी सक्रिय योगदान देणे अत्यंत आवश्यक आहे. भाऊसाहेबांचे जीवनकार्य हे या सर्व क्षेत्रांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे.

नागपूर पुस्तक महोत्सव–२०२५ मधील हा विशेष स्टॉल तरुणांमध्ये वाचनसंस्कृती वाढविण्यास, भाऊसाहेबांच्या कार्याची ओळख करून देण्यास आणि समाजात जागरूकता निर्माण करण्यास मोठ्या प्रमाणात उपयोगी ठरला.

## 👥 मान्यवरांच्या भेटी – सततची प्रेरणा

या नऊ दिवसांच्या महोत्सवात अनेक मान्यवरांनी स्टॉलला भेट देऊन साहित्याची पाहणी केली आणि उपक्रमाबाबत गौरवोद्गार काढले.





**श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष श्री. गजानन पुंडकर साहेब यांनी आज बुक फेस्टिवलमध्ये शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने लावलेल्या बुक स्टॉलला भेट दिली.**




**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. बारहाते सर, प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे सर आणि माजी आमदार प्रा. अनिल सोले यांनी महाविद्यालयाच्या Book Stall ला आज दिनांक 22.11.2025 सायंकाळी 6:00 वाजता सदिच्छा भेट दिली.**







**मा. डॉ. आवलगावकर, कुलगुरू, मराठी विद्यापीठ, रिधपूर–चांदुरबाजार, मा. श्री. सम्मन बनसोड, व्यवस्थापन परिषद सदस्य, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, मा. श्री. राठोड साहेब, आर.टी.ओ. मा. डॉ. मेश्राम, मा. चव्हाण साहेब यांची उपस्थिती लाभली.**








**दि. २५/११/२०२५ रोजी मा. श्री. कृपाल तुमाने माजी खासदार तथा विधानपरिषद सदस्य यांनी आज भेट दिली. या स्टॉलला मान्यवरांनी भेट देऊन पुस्तक प्रदर्शनाची विशेष पाहणी केली.**




दि. २९/११/२०२५ रोजी मा. श्री. राजे मुधोजी यांनी स्टॉलला भेट दिली. यावेळी मान्यवरांनी पुस्तक प्रदर्शनाची विशेष पाहणी केली.




दि. २८/११/२०२५ रोजी सौ. डॉ. स्मिता देशमुख प्राचार्य, विमलाताई देशमुख महाविद्यालय, अमरावती यांनी आपल्या महाविद्यालयातील सहकाऱ्यांसोबत भेट दिली.


Shri Shivaji Education Society,Amravati
श्री शिवाजी एज्युकेशन सोसाइटी
अमरावती विज्ञान महाविद्यालय
SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY
AMRAVATI'S SCIENCE COLLEGE
जीवनपट
realme 11 5G
28 November 2025 at 5:41 pm



Shri Shivaji Education Society,Amravati
141
DHAMMALIPI
धम्मलिपि
श्री शिवाजी एज्युकेशन सोसाइटी
अमरावती विज्ञान महाविद्यालय
SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY
AMRAVATI'S SCIENCE COLLEGE
जीवनपट
पुस्तक प्रदर्शनी व विक्री


Shri Shivaji Education Society,Amravati
141
श्री शिवाजी एज्युकेशन सोसाइटी
अमरावती विज्ञान महाविद्यालय
SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY
AMRAVATI'S SCIENCE COLLEGE
जीवनपट
शिक्षणमहर्षी व कृषिरत्न
पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख
यांचे जीवनचरित्र व कार्य
पुस्तक प्रदर्शनी व विक्री


Shri Shivaji Education Society,Amravati
श्री शिवाजी एज्युकेशन सोसाइटी
अमरावती विज्ञान महाविद्यालय
SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY
AMRAVATI'S SCIENCE COLLEGE
जीवनपट


श्री शिवाजी एज्युकेशन सोसाइटी
अमरावती विज्ञान महाविद्यालय
SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY
AMRAVATI'S SCIENCE COLLEGE
जीवनपट
२०% सवलत दरा


श्री शिवाजी एज्युकेशन सोसाइटी
अमरावती विज्ञान महाविद्यालय
SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY
AMRAVATI'S SCIENCE COLLEGE


श्री शिवाजी एज्युकेशन सोसाइटी
अमरावती विज्ञान महाविद्यालय
SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY
AMRAVATI'S SCIENCE COLLEGE
जीवनपट
141


शिक्षा मंत्रालय
भारत सरकार
MINISTRY OF EDUCATION
NAGPUR
BOOK
FESTIVAL
NAGPUR
BOOK
FESTIVAL
नागपूर पुस्तक महोत्सव
nbt.india
ZERO MILE
YOUTH
FOUNDATION

**नागपूर पुस्तक महोत्सव 2025** हा साहित्य, ज्ञान आणि प्रेरणेचा एक भव्य सोहळा ठरला. भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या साहित्याचा हा विशेष स्टॉल महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरला असून, वाचकांच्या मनात अमिट ठसा उमटवून गेला. विज्ञान महाविद्यालय, नागपूरचा हा उपक्रम — **"ज्ञानाचा प्रसार, मूल्यांची जपणूक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचे स्मरण"** हा उद्देश यशस्वीपणे पूर्ण करतो.

या पुस्तक महोत्सवादरम्यान सुमारे ६,००० वाचक, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, नागरिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावली. या काळात शेकडो लोकांनी पुस्तके, आकर्षक स्टॅच्यू आणि स्मरणार्थ नाणी खरेदी करून पुस्तकप्रेमाचा अनोखा उत्सव साजरा केला.

🏫 **आयोजनाची जबाबदारी:**

स्टॉलला भेट देणाऱ्या प्रत्येक मान्यवरांचे मनापासून स्वागत **मा. प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख** आणि **ग्रंथपाल डॉ. विजय डाखोळे** यांनी केले तसेच स्टॉलची संपूर्ण माहिती दिली. त्यांच्या नेतृत्वामुळे हा उपक्रम अधिक प्रभावीपणे पार पडला.

**----000----**